सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य हज समितीस निधी वितरित करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः हज-२०२६/प्र.क्र. १४३/का-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांकः- २० नोव्हेंबर, २०२६.

संदर्भः- १. महाराष्ट्र राज्य हज समितीचे क्र.अर्थसं.२०२६/प्र.क्र.२८/म.रा.ह.स./८३७, दि.०६.११.२०२६ चे पत्र.
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२४.
३. शासन निर्णय समक्रमांक, दि. ०४.०५.२०२६

प्रस्तावनाः-

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात "झेड ई १- ए, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम (०१) (१८), यात्रेकरुंचा खर्च २२३५ ए २६७, योजनेतर दत्तमत" "३६ सहायक अनुदाने (वेतन)" या उद्दिष्टासाठी महाराष्ट्र राज्य हज समितीच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी रु.६०,१७,०००/- इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूदीपैकी वित्त विभागामार्फत अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर ६० % म्हणजेच रु.३६,१०,२००/- इतका निधी वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये उपलब्ध निधीपैकी रु.२३,९२,००१/- इतका निधी महाराष्ट्र राज्य हज समितीस वेतनाकरिता वितरीत करण्यात आला आहे. संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य हज समितीने कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी उपलब्ध निधीपैकी उर्वरित निधी वितरीत करण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्र राज्य हज समितीने मागणी केल्यानुसार बीम्स प्रणालीवर उपलब्ध निधीपैकी समितीच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णयः-

महाराष्ट्र राज्य हज समितीने संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार महाराष्ट्र राज्य हज समितीच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील माहे जानेवारी, २०२७ ते माहे मार्च, २०२७ या कालावधीचा खर्च भागविण्यासाठी उपलब्ध निधीच्या मर्यादेत रु.१०,५०,०००/- (रुपये दहा लाख पन्नास हजार रुपये फक्त) इतका निधी महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई या कार्यालयास वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई यांच्याकडे सुपुर्द करण्यात येत आहे. याकरिता ते "नियंत्रक अधिकारी" आणि त्यांनी प्राधिकृत केलेले दुय्यम अधिकारी/कक्ष अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून काम पाहतील.

सदर निधी खर्च करताना वित्तीय नियमावली, महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका तसेच वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / परिपत्रक यातील अटी व शर्तींचा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई यांची राहील.

३. महाराष्ट्र राज्य हज समितीच्या सक्षम प्राधिकाऱ्याने मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीच्या मर्यादेत आपला खर्च करण्याची आवश्यक ती दक्षता घ्यावी व विहीत मुदतीत महालेखापालांच्या लेख्याशी खर्चाचा ताळमेळ घालण्याची जबाबदारी कक्ष अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई यांची राहील.

४. या प्रित्यर्थ होणारा खर्च "झेड ई १- ए, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम (०१) (१८), यात्रेकरुंचा खर्च २२३५ ए २६७, योजनेतर दत्तमत" "३६ सहायक अनुदाने (वेतन)" या उद्दिष्टाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर असलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६११२०१४५२४४८७१४ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

PRATIMA DIPAK CHAUDHARI

Digitally signed by PRATIMA DIPAK CHAUDHARI
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Minority Development Dept, 2.5.4.20=2D9654C024FB81D5E4951258837A06AE320797B4EFEC5EB438AE98EB101F2C63, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=120E5934036F543ED2A3BBD361E1E6A7B1EEB26F4E3348DCB17862F7FD825505, cn=PRATIMA DIPAK CHAUDHARI
Date: 2026.11.20 14:53:49 +05'30'

(प्रतिमा चौधरी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर, महाराष्ट्र राज्य.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३. कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई
४. अवर सचिव (व्यय-१/अर्थ-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अवर सचिव (का-७), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, रुम.क्र.६ व ७, तळमजला, साबू सिद्दिकी, मुसाफिरखाना, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.
७. निवडनस्ती (का-५).